अंक ०८
जुलै २०२५

Issue 08
July 2025

या अंकात | In this issue

उपक्रमाबद्दल /
About the Initiative

माझी मराठीविषयीची ओढ
- धार्मिक शहा

My Fascination for Marathi Language - Dharmik Shah

आंबेडकरवादाचा खणखणीत उद्गार : शाहीर वामनदादा कर्डक
- सानिका म्हसकर

The Resounding Voice of Ambedkarite Ideology: Shaheer Vamandada Kardak
- Sanika Mhaskar/Prabha Kulkarni

मराठी स्त्री-गीतांतील सीता
- आदिती जाधव

Sita in Marathi Folk Songs Composed by Women - Aaditi Jadhav/Prabha Kulkarni

Learn a Marathi word:
गाणे / *gāṇē*

उपक्रमाबद्दल

मराठी भाषा, साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा फ्लेम विद्यापीठातील विविध भाषा-संस्कृतींचा भाग असलेल्या अभ्यासकांना परिचय करून देण्यासाठी, तसेच महाराष्ट्र आणि मराठी यांविषयीच्या अभ्यासात सर्वांना सामील करून घेण्यासाठी मराठी भाषा आणि साहित्य उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

आज शिक्षणक्षेत्रामध्ये प्रादेशिक भाषांचा वापर आणि त्यांचा अभ्यास कमी होत चालला आहे. मराठीसारख्या समृद्ध परंपरा असलेल्या प्रादेशिक भाषांचा आणि संस्कृतींचा अभ्यास करणे, तसेच त्यांचे संवर्धन करणे गरजेचे आहे. ही गरज ओळखून, ज्ञानाच्या, आणि सामाजिक व सांस्कृतिक अभ्यासाच्या, उपयोजनाच्या संदर्भांत मराठी भाषा-साहित्याची जपणूक नि विकास यांसाठी प्रयत्न करायला हवेत.

About the Initiative

The Marathi Language and Literature Initiative at FLAME University aims to build a dedicated academic space to critically examine the diverse culture, traditions, and knowledge systems that exist within Maharashtra.

Critical engagement with languages from the region and their role in everyday communication — especially within academic spaces — is gradually diminishing. Recognizing this gap, the Marathi Language and Literature Initiative emphasizes the preservation, promotion and popularization of the Marathi language and culture.

मराठीच्या अशा सर्वांगीण विकासासाठी मराठीविषयीच्या संशोधनास प्रोत्साहन आणि पाठिंबा देण्याच्या उद्देशाने फ्लेम विद्यापीठात मराठी भाषा-साहित्यविषयक उपक्रम राबवला जात आहे.

मराठी भाषा-संस्कृती शिकवणे, तिचा प्रसार करणे, तिच्याविषयीच्या संशोधनाला चालना देणे या तीन घटकांना केंद्रस्थानी ठेवून, फ्लेममध्ये मराठीविषयक अभ्यासासाठी व देवाणघेवाणीसाठी एक अवकाश निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. मराठी भाषा-साहित्याविषयीच्या व्यापक चर्चेत योगदान देण्याचा आमचा उद्देश आहे. महाराष्ट्रातील विविध संस्कृतींचा, परंपरांचा आणि ज्ञानव्यवस्थांचा सखोल अभ्यास आणि चिकित्सा करण्यासाठी ज्ञानक्षेत्रात अनुकूल वातावरण निर्माण करणे हा मराठी भाषा आणि साहित्य उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

- डॉ. आशुतोष पोतदार

Through research and promotion of Marathi language and literature in the broad socio-cultural and educational contexts through various activities at the campus, we seek to introduce it to the multilingual and multicultural learners and audiences at FLAME in an inclusive and enriching environment.

Focusing on promotion, research, and pedagogy, the Marathi Language and Literature Initiative ensures that the Marathi language and culture are represented in the educational discourse and will maintain a vibrant presence at FLAME.

- Dr. Ashutosh Potdar

माझी मराठीविषयीची ओढ

धार्मिक शहा

मराठी वृत्तपत्रिकेच्या संपादन-समितीने मला मराठीशी असलेल्या माझ्या नात्याबद्दल लिहायला सांगितलं. तेव्हा खरं तर, मला कुठून सुरुवात करावी हेच कळेना. पण विश्वाचं संकेत देण्याचं एक वेगळंच तंत्र असतं. सध्या पावसाळा सुरू आहे आणि मुंबई शहरभर पावसाचे शुभाशीर्वाद कोसळत आहेत. सर्वत्र हिरवळ नजरेस पडते आहे. अशा वेळी मला बालकवी या प्रसिद्ध मराठी कवींची *श्रावणमास* ही सुंदर कविता आठवते. जर तुम्ही महाराष्ट्रात बऱ्याच काळापासून राहत असाल, तर तुम्ही ही कविता नक्कीच वाचली किंवा ऐकली असेल :

“श्रावणमासीं हर्ष मानसीं हिरवळ दाटें चोहिंकडे;
क्षणांत येतें सरसर शिरवें,
क्षणांत फिरुनि ऊन पडे ||१||”

My Fascination for Marathi

Dharmik Shah

When the editorial committee of this Marathi Newsletter asked me to write about my fascination towards Marathi as a person who speaks it as a second language, I did not know where to start from. However, the universe has its own way of signalling. The Rain Gods are showering their blessings all across the city of Mumbai and suddenly there's greenery all around. It brings to my mind the beautiful poem *Shravanamas* by 'Balkavi', a renowned Marathi poet, which I am sure you must have definitely read or heard, if you have lived in Maharashtra for a long time:

“In the month of *Shravana*,
the heart is joyful and light,
as greenery spreads on all sights;
In just a moment, down pours the rain,
and in the next, the sun shines bright.”

ही कविता मला माझ्या बालपणाच्या सुंदर आठवणींमध्ये घेऊन जाते. खरं तर, मराठी भाषेशी माझी ओळख कवितेच्या माध्यमातूनच झाली. त्यामुळेच कदाचित मला मराठी आवडायला लागली असावी. श्रीमती एम. डी. भाटिया इंग्लिश मीडियम हायस्कूल या आमच्या मुंबईतील घाटकोपरमधल्या शाळेत रोज पहिला तास 'मूल्यशिक्षणा'चा असायचा. त्या तासाच्या शेवटी आमच्या शिक्षिका आमच्याकडून संत ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीतील 'पसायदान' म्हणवून घेत असत. '*पसायदान*' ही *ज्ञानेश्वरी* या ग्रंथाच्या शेवटी लिहिलेली विश्वाच्या कल्याणासाठीची प्रार्थना आहे. आजही जेव्हा मला जीवनाचा अर्थ शोधावासा वाटतो किंवा विश्वचेतनेसाठी प्रार्थना करावीशी वाटते, तेव्हा मी 'पसायदान' म्हणण्याचा प्रयत्न करतो.

This song brings to me the beautiful memories of my childhood. Indeed, poems have been the way the Marathi language was introduced to me and perhaps that's why I started loving it. Every day, our first session in our Smt. M. D. Bhatia English Medium High School was on 'Value Education', and at the end of every such session, our teacher made us sing *Pasaydan* (a prayer for the well-being of the whole universe), the beautiful concluding verse from *Jnaneshvari*. Even today, I try to sing it when seeking the meaning of life and praying for universal consciousness.

Dharmik Shah with other representatives selected for the 'Preparing Global Leaders Academy Programme' organised in Jordan

Dharmik Shah

मी जरी गुजराती घरात वाढलो असलो, तरी मला हे भाग्य लाभलं की माझ्या आईवडिलांनी मला मराठी शिकण्यासाठी प्रोत्साहन दिलं. त्यांनी मला एक मुंबईकर म्हणून मराठी संस्कृतीचा अभिमान बाळगायला शिकवलं. आता, मी मराठी शिकलो कसं, ते सांगतो. सुदैवाने, आमच्या शाळेने 'बृहन्मुंबई निम्नस्तर मराठी शिक्षण संघटना'यांच्याद्वारे घेतल्या जाणाऱ्या 'मराठी भाषा परीक्षा' देण्यासाठी आम्हाला प्रोत्साहित केलं. परीक्षा सुरू होण्याच्या काळात संपूर्ण शाळेत एक वेगळाच उत्साह असायचा. स्मृती चुनेकर मॅडम आणि मेरी गोन्साल्विस मॅडम या आमच्या दोन शिक्षक आम्हांला खूप प्रभावी आणि रंजक पद्धतीने शिकवत असत.

Coming from a Gujarati household, I am very blessed to have parents who encouraged me and emphasized putting in efforts to learn Marathi, and as a Mumbaikar, to take pride in the Marathi heritage. Now, how did I do that? Fortunately, our school encouraged us to take the 'Marathi Bhasha Pariksha' organized by 'Brihanmumbai Nimnastar Marathi Sikshan Sanghatana'. Our entire school was very excited during the preparation of these exams and two of our teachers — Ms. Smruti Chunekar and Ms. Mary Gonsalves — helped us prepare for these exams in a very engaging and effective manner.

दहावीतही मराठी विषय मला इतका भावला की मला त्याच्या अभ्यासासाठी कधी पाठांतर करावं लागलं नाही. मला अजूनही आठवतं, मी माझ्या दहावीच्या मराठीच्या परीक्षेत निबंध आणि सगळी उत्तरं मनापासून, भावनांनी भरून लिहिली होती. माझ्या मते, स्वतःला असं व्यक्त करता येणं, हाच तर कुठलीही भाषा शिकण्यामागचा मुख्य उद्देश असतो.

नंतर मी अकरावी-बारावीला विज्ञान शाखेत गेलो. तेव्हा पर्यायी भाषा म्हणून फ्रेंच घेतली, त्यामुळे पुढची दोन वर्षं माझा मराठीशी संपर्क तुटला. पुढे मी बंगळुरूला आणि मग जयपूरला गेलो. तिथे मला एक विलक्षण गोष्ट कळली. गोवा, कर्नाटकमधील बेळगाव, तेलंगणातील आसिफाबाद जिल्हा, गुजरातमधील बडोदा आणि मध्य प्रदेश इथून आलेले माझे काही मित्र मराठी बोलायचे. यामुळे मला हे लक्षात आलं की मराठी फक्त महाराष्ट्रातच बोलली जात नाही, तर ती इतर राज्यांमध्ये सुद्धा बोलली जाते. वेगवेगळ्या राज्यांमधून आलेलो आम्ही सगळे मराठीच्या या भाषिक नात्याने जोडले गेलो. पुणे, गडचिरोली, जळगाव, लातूर इथून आलेल्या मित्रांनी त्यांच्या-त्यांच्या स्थानिक संस्कृतींचे अंश माझ्या महाविद्यालयीन जीवनात मिसळले.

त्या वेळी मला वाटायचं की मराठी या भाषेचं माझ्या आयुष्यातलं स्थान फक्त वैयक्तिक आकर्षणापुरतं मर्यादित राहणार का ? व्यावसायिक जीवनात ती उपयोगी पडेल का ? पण जसं मी आधी म्हटलं, देवाच्या योजना निराळ्या असतात ! मी जयपूरमधील IIHMR या संस्थेत सार्वजनिक आरोग्य या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत होतो. तेव्हा मला गडचिरोलीतील ग्रामीण भागात काम करणाऱ्या, पद्मश्री डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग यांनी स्थापन केलेल्या सर्च (SEARCH) या संस्थेत इंटर्नशिपची संधी मिळाली. तिथे मी ‘तारुण्यभान’ या उपक्रमात काम केलं. हा उपक्रम किशोरवयीन प्रजनन आणि लैंगिक आरोग्य यांच्याशी संबंधित होता. मला मराठी येत असल्यामुळे मी या कामाकरिता निवडला गेलो. स्थानिक लोकांशी संवाद साधण्यामध्ये आणि त्यांचा विश्वास कमावण्यामध्ये मराठी भाषेने मला खूप मदत केली.

नंतर मी नोकरीसाठी दिल्लीला गेलो. भाषेचं संपूर्ण वातावरण बदललं. तिथे मी बंगाली, थोडंसं ओडिया वगैरे शिकायला सुरुवात केली — कारण त्या भाषांमध्ये मराठीसारखं काहीसं जाणवत होतं. पण तिथे मराठीभाषक सहकारी नसल्यामुळे माझी मराठीशी असलेली साखळी हळूहळू तुटायला लागली.

In fact, I found the subject so fascinating in my 10th Grade that I never had to rote learn the content for the Marathi examination. I very well remember that I wrote all the answers and an essay in my 10th Grade Marathi exam by my heart in a very expressive manner — which, according to me, is the main goal of learning any language.

When I moved to 11th and 12th Grade, I opted for the Science Stream and decided to take French as my optional language. So, I lost touch with the Marathi language for two years. I, then, moved to Bangalore and later to Jaipur. I discovered something very fascinating. I made friends from Goa, Karnataka (from Belagavi), Telangana (from Asifabad District), Gujarat (from Baroda), and Madhya Pradesh, who spoke Marathi too. This shattered my perception that Marathi is spoken only in Maharashtra. There is a diaspora who speaks the Marathi language and this formed the connecting link for all of us, though we came from different states of India. Similarly, my friends from Pune, Gadchiroli, Jalgaon and Latur brought pieces of their own culture, which enriched my college life.

However, I would wonder, how would the Marathi language be useful for me in my professional endeavours apart from my personal fascination towards it. But, as I shared earlier, God always has different plans! During my Master’s degree in Public Health, which I completed from IIHMR in Jaipur, I had a rare opportunity to intern at Society for Education, Action, and Research in Community Health (SEARCH) in Gadchiroli in rural India, started by Padmashri Dr. Abhay and Dr. Rani Bang. I worked on the Adolescents’ Reproductive and Sexual Health Programme called ‘*Taarunyabhaan*’. Firstly, I was selected for the internship given all competencies remaining the same, I had the advantage of knowing Marathi. I was able to work with the communities and learn more about public health as well as win their trust because I spoke the Marathi language.

दिल्ली हाटमधील महाराष्ट्र फूड स्टॉल हेच काय ते माझं मराठीशी एकमेव नातं उरलं होतं. पण काही, विशेषतः महाराष्ट्रातील ग्राहक-अभ्यासाशी संबंधित संशोधन-प्रकल्प मला दिले जायचे. त्यांमध्ये मी प्रश्नावल्यांचं भाषांतर करत असे, व महाराष्ट्रातील जीवनशैली व संस्कृती समजावून सांगण्याचं काम करत असे. मग मी चंदीगडला गेलो. तिथे पंजाबी, काश्मिरी, डोगरी या भाषांशी माझी ओळख झाली. पण काही वर्षांनी मी पुन्हा सुरुवातीच्या ठिकाणी — मराठीकडे — परतलो.

तोपर्यंत अचानक एके दिवशी मी 'भाडिपा' हे अफलातून सोशल मीडिया चॅनल पाहिलं, आणि त्यांचे व्हिडिओ पाहायला सुरुवात केली. त्याच वेळी मी काही अप्रतिम मराठी चित्रपटही पाहिले — विशेषतः सतीश राजवाडे यांचा 'मुंबई-पुणे-मुंबई' आणि चैतन्य ताम्हाणे यांचा 'कोर्ट'. भाडिपावरील एका पॉडकास्टमुळे प्रेरित होऊन मी डॉ. अनघा मांडवकर यांना संदेश लिहिला, आणि त्यांनी मला मराठी शिकण्यासाठी काही उपयुक्त स्रोत पाठवले. तेव्हापासून मी स्वतःच्या गतीने पुन्हा मराठी शिकायला सुरुवात केली. मराठीमध्ये मी कदाचित पूर्वीइतका सरावलेला नाही. मोठं झाल्यावर नवीन भाषा शिकायला वेळही लागतो. पण या वर्षी पुन्हा मुंबईत परत आल्यावर मी अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होतोय. या कार्यक्रमांतून भाषेद्वारे जगाकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन मला मिळतोय. २०२४ मधील 'लिटरेचर लाइव्ह फेस्टिव्हल'मध्ये मी 'लिरिका कम्स टू टाऊन' हा कार्यक्रम पाहिला, ज्यामध्ये स्लोव्हेनियन कविता मराठीत व इंग्रजीत सादर करण्यात आल्या होत्या. या कार्यक्रमाने मला प्रेरणा दिली की जगभरातील साहित्य मराठीत वाचावं, आणि मराठी साहित्य इतर भाषांमध्येही अनुवादित व्हावं. 'काळा घोडा महोत्सवा'मध्येही मी मराठी कलाकृती पाहिल्या.

माझी एक प्रेमळ तक्रार आहे — मराठीच्या संदर्भातून भाषांतरविषयक अभ्यासक्रम फारसे उपलब्ध नाहीत किंवा फारच कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. आपल्या राज्यातील विद्यापीठांनी (विशेषतः सार्वजनिक विद्यापीठांनी) यामध्ये गुंतवणूक केली पाहिजे. कल्पना करा — पु. ल. देशपांडे यांचं लेखन पोलंडमध्ये वाचलं जातंय, किंवा विष्णुदास भावे यांची नाट्यकृती व्हेनेझुएलामध्ये सादर केली जातेय — किती अद्भुत दृश्य असेल ! हे दृश्य वास्तवात यावं यासाठी मला मनापासून प्रयत्न करायचे आहेत. मला माहीत आहे की सध्या हे एक मोठं स्वप्न वाटेल.

Later on, I moved to Delhi for my job. The linguistic scenario changed completely. I picked up on other languages including Bengali, bits of Odia etc. as I found them to be very similar to Marathi. But, unfortunately, in the entire process and having no native speakers around, I started losing touch with Marathi. The only connection that I had with Marathi was the Maharashtra Food Stall at Delhi Haat. However, a good part was that a few research studies (especially on consumer research) which were to be conducted in Maharashtra were entrusted to me and I was involved in translation of questionnaires and helping my clients understand the way of life and culture of Maharashtra. As I moved further in the North to Chandigarh, I picked up Punjabi, Kashmiri and Dogri. And after a few years, it was back to square zero — the Marathi language.

Meanwhile, I suddenly saw 'BhaDiPa', a fantastic social media channel and started consuming its videos along with wonderful movies from Marathi cinema — my favourites being 'Mumbai-Pune-Mumbai' by Satish Rajwade and 'Court' by Chaitanya Tamhane. On listening to a podcast on BhaDiPa, I wrote to Dr. Anagha Mandavkar, who has been providing me with a lot of resources to learn the language. And since then, I have started to re-learn the language at my own pace. I might not be as fluent as I was earlier. Being an adult, it may also take me more time to learn the language. But, as I moved to Mumbai again this year, I have started engaging myself in a lot of cultural productions and events, which has opened new vistas of understanding the world through language. In the Literature Live Festival at NCPA in 2024, one of the interesting events that I attended was 'Lirika Comes to Town', which was a performance of Slovenian Poetry in Marathi and English. This opened my mind to think of reading 'Literatures of World in Marathi', and I hope that a lot of Marathi Literature gets translated to other languages. Similarly, at the Kala Ghoda Festival in Mumbai, I was able to watch performances in Marathi language.

पण प्रत्येक प्रवासाची सुरुवात एका पावलानेच होते — आणि ते पहिलं पाऊल म्हणजे माझं हे मराठीविषयीचं मराठीतलं लेखन.



Dharmik Shah's Marathi handwriting

A sincere complaint that I have is, there aren't many courses in Translation Studies with Marathi as a pair language; I think, our government / universities, especially public universities, must invest in this area. How fascinating would it be if P. L. Deshpande's literature is read by readers in Poland and Vishnudas Bhave's plays are performed in Venezuela! Nevertheless, this is a very lofty dream for the time being. One Step at a time — the first one being, me writing this piece on Marathi, in Marathi, and translating it in English.

धार्मिक शहा हे प्रशिक्षित अनुवंशशास्त्रज्ञ आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिक असून, धोरण- सल्लागार म्हणून काम करणे आणि व्यवसाय-विषयाचे अध्यापन ह्यांचाही त्यांच्याकडे अनुभव आहे. बहुवैशिष्ट्यपूर्ण क्षमता असलेल्या त्यांना भाषा शिकणे, सर्जनशील व सांस्कृतिक उपक्रम, आणि तात्त्विक चिंतन ह्यांविषयी खूप आवड आहे. त्यांना प्रवास करायला खूप आवडते. त्यांनी भारतातील एकोणतीस राज्यांत आणि चारशे पन्नासहून अधिक जिल्ह्यांत प्रवास केला आहे.

Dharmik Shah is a trained geneticist and public health professional, with experience as a strategy consultant and business academic. He is a multi-potentialite with a deep passion for learning languages, the creative and cultural pursuits, as well as philosophical inquiry. He loves travelling and has been to 29 states and 450+ districts of India.

आंबेडकरवादाचा खणखणीत उद्गार : शाहीर वामनदादा कर्डक

सानिका म्हसकर

शाहीर वामनदादा कर्डक म्हणजे सामाजिक परिवर्तनाच्या क्रांतीची ज्योत अखंड तेवत ठेवणारे एक प्रतिभावंत आणि परखड लोकशाहीर ! आजही लाखो दीन-दलितांच्या, उपेक्षितांच्या घरांत, त्यांच्या ओठांत त्यांची गाणी खेळत आहेत. आंबेडकरी चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते असलेल्या वामनदादांची ही गीतं आंबेडकरी विचारांची गीतं म्हणून ओळखली जातात. वामन तबाजी कर्डक यांचा जन्म दिनांक १५ ऑगस्ट १९२२ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यामधील देशवंडी या गावी झाला. वामनदादांनी गावाकडे असताना आपल्या उपजीविकेसाठी गुरं पाळणं, जत्रेत कुस्ती खेळणं अशी काही कामं केली होती. मग ते मुंबईला आले, आणि शिवडी येथे गिरणी-कामगार म्हणून नोकरीला लागले. त्यांनी मातीकाम करणं, चिक्की विकणं, खडी फोडणं, टाटा ऑइल मिलमध्ये काम करणं अशी सगळ्या प्रकारची कष्टाची कामं केली होती. या कामांमुळे त्यांचा कायमच तळागाळातील लोकांशी अतूट संपर्क राहिला, ज्याचं प्रतिबिंब त्यांच्या लिखाणात उमटलं. दिनांक १५ मे, २००४ रोजी त्यांचं निधन झालं. आयुष्याच्या अखेरपर्यंत ते गीतांचं लेखन व गायन या माध्यमांतून आंबेडकरी विचारांचा प्रचार-प्रसार करीत होते.

वामनदादा कर्डक यांनी साधारणतः १९४३पासून कविता-लेखनाला सुरुवात केली. त्या काळात लिहिणाऱ्या प्रत्येकालाच हिंदी, मराठी चित्रपटगीतांच्या चालींचं आकर्षण होतं. हे आकर्षण वामनदादांनी सुद्धा जोपासलं होतं. वामनदादांनी चित्रपटांसाठी लिहिलेली 'सांगा या वेडीला, माझ्या गुलछडीला' (चित्रपट : *सांगत्ये ऐका*) इत्यादी गाणीही प्रचंड लोकप्रिय झाली होती. आंबेडकरी चळवळीतील मोठे नेते कर्मवीर दादासाहेब गायकवाड वामनदादांना म्हणाले की, 'डॉ. आंबेडकरांचा विचार घराघरात पोहोचणं हीच आपली खरी गरज आहे आणि या कार्याला तुझ्या शब्दांची गरज आहे.' असं म्हणतात की त्यांचा शब्द प्रमाण मानून वामनदादांनी भीमगीतांनाच (डॉ. बाबासाहेब ऊर्फ भीमराव आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करणाऱ्या गीतांनाच) आपलं आयुष्य समर्पित केलं. वामनदादांनी त्यांच्या आवडत्या चित्रपटगीतांच्या चालींवरही स्वतःची काही गाणी रचली.

The Resounding Voice of Ambedkarite Ideology: Shaheer Vamandada Kardak

Original Marathi: Sanika Mhaskar
English Translation: Prabha Kulkarni

Shaheer Vamandada Kardak was a talented and outspoken poet who kept the flame of social revolution burning unwaveringly! Even today, millions of poor, Dalits and the marginalised sing his songs by heart. Since he was one of the revolutionaries participating in the Ambedkarite movement, his songs are recognised as songs representing the same ideology. Vaman Tabaji Kardak was born on 15 August 1922 in Deshvandi, a village in the Sinnar Taluka of Nashik district. When he was in the village in his early years, he took up a variety of jobs like herding cattle and wrestling in fairs, to earn a living. Later, he moved to Mumbai and started working in Sewri as a mill worker. He had done many different kinds of labour- intensive jobs like working with mud, selling chikkis (peanut-based sweets), breaking stones, and working at TATA Oil Mills. These experiences always helped him stay deeply connected with people at the grassroots, which is an aspect that resonated in his writing. He passed away on 15th May 2004, dedicatedly writing and spreading Ambedkarite thought through the singing and writing until his death.

Vamandada Kardak began writing poems around 1943. At the time, many songwriters were drawn to the melodies of Hindi and Marathi cinema music, which had an influence on Kardak as well. His songs like "Sanga Ya Vedila, Majhya Gulchadila" (Movie: *Sangtye Aikaa*) and more had become quite popular. However, things changed when a prominent leader in the Ambedkarite movement, Karmaveer Dadasaheb Gaikwad, told him, "Spreading the thoughts of Dr. Ambedkar is our true goal and for that, we need your words."

पण चाली आणि मूळ गाणी लोकांच्या ओळखीची असून सुद्धा, त्या चालींत रचलेली शाहीर वामन कर्डक यांची भीमगीतं ही त्यांतील वैचारिक, सामाजिक प्रबोधनाच्या आशयामुळे नवी आणि एक नवा डोळस विचार देणारी ठरली.

समाजातील विषमतेचं चित्र वामनदादांना अस्वस्थ करत होतं. या विषमतावादी विचारांतून समाजाला कायमचं बाहेर काढण्यासाठी त्यांनी लेखनाचा मार्ग निवडला. ते म्हणायचे की, "मी अडाणी असेन पण आंबेडकरांच्या विचारांनी मला लाखमोलाची शिकवण मिळाली आहे." हीच शिकवण त्यांनी वाटचाल, मोहळ, हे गीत वामनाचे अशा त्यांच्या काव्यसंग्रहांतून लोकांपर्यंत पोहोचवली. त्यांच्या प्रकाशित आणि अप्रकाशित मिळून साधारणतः दहा हजारांच्या आसपास रचना असल्याचा अंदाज आहे. *उद्धरली कोटी कुळे, भीमा तुझ्या जन्मामुळे* ! हे त्यांचं सगळ्यांत लोकप्रिय गाणं असावं. *साऱ्या जगात देखणी बाय मी भीमाची लेखणी*, *तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे*, *उघडलाच नाही काळारामाचा दरवाजा* अशी त्यांची कितीतरी गीतं प्रचंड गाजली, आताही लोकप्रिय आहेत. आजही आंबेडकर-जयंती त्यांच्या गीतांशिवाय अपूर्ण वाटते.

वामनदादांच्या आधी महाराष्ट्रात, महात्मा जोतीराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या विचारांचा प्रसार करणारे सत्यशोधकी जलसे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित आंबेडकरी जलसे यांच्या परंपरा चालत आल्या होत्या. पण जलशांमधील कलाकार काही पारंपरिक कवनंही सादर करत असत. ही गाणी समाजाने ऐकलेली होती. शिवाय, त्यांत काही अंशी पारंपरिक मानसिकतेचा — दैववाद इत्यादींचा — प्रभाव दिसायचा. परंतु वामनदादांच्या रचनांनी या चित्रात समग्र बदल घडवला. गाण्यांच्या आशय-विषयांत बदल घडवताना, त्यांनी सादरीकरणातही बदल केले; यामुळे नव्या जगाचं एक नवं गाणं जन्माला आलं !

लोकवाङ्मयाचे अनेक प्रकार आहेत. असे गोंधळ, भारूड, लावणी, ललित इत्यादी लोकवाङ्मयाचे प्रकार जाणणारे आणि त्यांत आविष्कार करणारे लोकसमूह होते नि आहेत. वामनदादांच्या कवितेत लोकमनाची लोक-ढंगातील अभिव्यक्ती येते, पण त्यांची कविता ही पारंपरिक लोककविता नाही. वामनदादांची कविता ही खऱ्या अर्थाने आधुनिक आंबेडकरवादी गेय कविता आहे. वामनदादांनी असं म्हणून ठेवलंय की, "मी चातुर्वर्ण्याची चौकट तोडली.

It is said that these words were taken to heart by Vamandada, which led him to devote his life to Bhimgeete (Songs that propagate the ideologies of Dr. Babasaheb Ambedkar). Vamandada composed some of his songs on the tunes of his favourite film songs. Although the tunes and the original film songs were known to people, Vamandada's Bhimgeet-compositions were considered novel and revolutionary as they were full of intellectual depth and social consciousness, showcasing this known music in a new light.

Kardak was disturbed by the harsh inequalities in society. He chose the path of writing to try to pull society out of this deeply ingrained discrimination. He used to say, "I may be illiterate but Ambedkar's thoughts have given me a lot of wisdom." He passed on this gained wisdom through his poetry collections like *Waatchaal*, *Mohol* and *He Geet Vamanaache*. Combining his published and unpublished works, it is said that he wrote around ten thousand pieces. His most popular piece is called *Uddharli Koti Kule, Bhima Tujhya Janmamule!* Other of his renowned songs include *Saarya Jagaat Dekhani Bai Mee Bhimachi Lekhani*, *Toofanatle Dive Aamhi Toofanatle Dive*, and *Ughadalaach Nahi Kalaramacha Darwaza*. Even today, without these songs, the celebration of Ambedkar Jayanti would feel incomplete.

Before Vamandada, traditions like the Satyashodhak *Jalse*, which were musical performances propagating Mahatma Jyotirao Phule's ideas and establishment of the Satyashodhak Samaj and Ambedkari Jalse based on Dr. Babasaheb Ambedkar's ideas, were quite popular in Maharashtra. But, the *Jalse*-performers would also perform some traditional songs. These songs were quite heard of by the people and were tinted with conservative thinking like that of fatalism, etc. However, Kardak's songs took a different path altogether. He not only transformed the themes and the content of the songs, but also explored new ways in which they can be presented. This birthed a new kind of music for a new world.

तसाच मी काव्यशास्त्राच्या चौकटीतून सुद्धा मोकळा आहे. तरी गाणं म्हटलं म्हणजे यमक हे आलंच. संपूर्णपणे यमकाचं बंधन तोडता येत नाही. मी संगीतशास्त्राचे नियम सुद्धा मोडले आहेत. तरी आमच्या देखील गाण्याला एक शास्त्र आहे."

वामनदादांनी त्यांच्या गायनातून कायमच गौतम बुद्ध, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची महती मांडली. त्यांची लेखणी ऐकणाऱ्याच्या मनाचा ठाव घेतल्याशिवाय राहत नाही. त्यांचं लेखन हे परखड असलं, तरी बोचरं कधीच नव्हतं. एका तळमळणाऱ्या माणसाची तळमळ व्यक्त करण्यासाठीच त्यांनी आपली गाणी लिहिली, प्रकाशित केली व गायली. आंबेडकरी विचारांच्या कवितांचे प्रवर्तक असलेले वामनदादा स्वतःचे आदर्श, प्रेरणा आणि विचार घेऊन लिहीत होते.

वामनदादा कर्डक यांनी समाजाने बाजूला फेकलेल्या प्रत्येक माणसाचं स्वगत त्यांच्या लेखणीतून मांडलं. जणू काही, समाजातील त्रासलेल्या प्रत्येक माणसाचा ते आवाज बनले. त्यांनी अनेकदा धर्म, जातिव्यवस्था, त्यातल्या अडचणी, त्रास यांवर लिहिण्याबरोबरच, घरातील महत्त्वाचे नातेसंबंध आणि त्यांची रचना यांवर सुद्धा आपल्या कवितेतून विचारप्रवर्तक भाष्य केलं. त्यांनी अनेक स्त्रियांच्या व्यथा आपल्या कवितेतून जगासमोर मांडल्या. ते स्वतःला 'नाकारलेल्या समाजाचा प्रतिनिधी' म्हणवत. रोजच्या वापरातले अगदी साधे शब्द आणि कवितेची गेयता (गाण्याजोगं असणं) ही त्यांच्या लिखाणाची वैशिष्ट्यं होती. अगदी साध्यातला साधा न गाणारा माणूस सुद्धा त्यांची गाणी गुणगुणू शकत होता. त्यांच्या नुसत्या शब्दांनी अनेकांच्या मनांत व हातांत बळ संचारलं, उपेक्षित वर्गामध्ये एक प्रकारची ऊर्जा आली.

वामनदादांना त्यांच्या या महान कार्यासाठी अनेकानेक राष्ट्रीय, राज्यस्तरीय सन्मानांनी, पुरस्कारांनी गौरवण्यात आलं. महाराष्ट्र राज्य शासनाचा 'दलितमित्र पुरस्कार' त्यांना मिळाला होता. सन १९९३ मध्ये वर्धा येथे आयोजित झालेल्या पहिल्या अखिल भारतीय आंबेडकरी साहित्यसंमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषवलं होतं. वामनदादा कर्डक हे खऱ्या अर्थाने आंबेडकरी विचार जपणारे, एक समाज-परिवर्तक महाकवी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रती निस्सीम निष्ठा असलेल्या या त्यांच्या प्रतिभावान विचार-दूताने आपल्या शाहिरीतून त्यांची कीर्ती, त्यांचे विचार यांचा सर्वदूर प्रसार करण्यात अभूतपूर्व यश संपादन केलं. ज्येष्ठ मराठी साहित्यिक

There are various types of folk literature like Gondhal, Bharud, Lavani, Lalit and more, which have been kept alive by their specific performing communities. Vamandada's poetry contained the notion of such folk expression, but was far from traditional folk poetry. His poetry was modern Ambedkarite poetry in its true essence. He had said, "I have broken free from the four walls of the caste system just as I have broken free from the for walls of classical poetry. But, when one looks at music, rhyme is inevitable. It cannot be broken free. I have broken the rules of classical music too; yet our songs also have their own discipline."

Vamandada always talked about the work of Gautam Buddha, Mahatma Phule and Dr. Babasahed Ambedkar through his music. His words, without fail, used to touch the listener's heart. Although his writing was outspoken it would never prick the listener unnecessarily. He wrote, published and sang his songs to express the agony of a deeply anguished and disturbed human being. Kardak wrote with his own ideals, inspirations and convictions becoming a pioneer of Ambedkarite poetry.

Vamandada Kardak, through his writing, gave voice to every human who was ever thrown aside by society. It was as if he became the voice of every distressed soul. He not only wrote about religion, caste system and the hardships caused by it, but also thoughtfully addressed the important relationships and their structure in a household. He reflected the unspoken pain of many women through his poetry. He would call himself "a representative of someone rejected from society". His writing is characterised by the use of simple words and the lyrical quality of his poetry. His songs could very easily be hummed. His words alone gave strength to hearts and hands alike, enlightening the oppressed with energy.

Vamandada received many national and state-level honours in recognition of his contributions. He was awarded the "Dalit Mitra Puraskar" by the Maharashtra State Government. In 1993, he presided over the First All-India Ambedkarite Literary

इंद्रजीत भालेराव यांनी म्हटल्याप्रमाणे, "तुकारामांनी जसा विठ्ठल घराघरात पोहोचवला, तसे वामनदादांनी आंबेडकर घराघरात पोहोचवले." आजही त्यांच्या भीम-लेखणीतून पुरोगामी, परिवर्तनवादी विचारवंतांना, कार्यकर्त्यांना प्रेरणा आणि बळ मिळतंय.

Conference held in Wardha. Vamandada Kardak was truly a poet who transformed and upheld the spread of Ambedkarite thought. This brilliant messenger of Ambedkarite thought carried forward Dr. Ambedkar's legacy with unwavering devotion through his poetry, achieving huge success. As a senior Marathi writer Indrajit Bhalerao says, "Just like Tukaram brought Vitthal into every home, Vamandada brought Ambedkar into every home". Progressive thinkers and activists draw inspiration and strength from the Ambedkarite essence that flows through his writing, even today.

संदर्भ:

- संपादक : मोरे, प्रशांत आणि मोरे, सिद्धार्थ. *महाकवी वामनदादा कर्डक गाणं शतकानुशतकांचं खंड १.* प्रतिमा प्रकाशन, पुणे.
- संपादक : पैठणकर, कुणाल. (२०२२) *महाकवी वामनदादा कर्डक गौरव ग्रंथ.* ग्रॅव्हिटी पब्लिकेशन, अकोला.

आंतरजालावरील दुवे

- वामनदादांविषयीची मराठी विकिकोशातील नोंद : https://mr.wikipedia.org/wiki/वामन_कर्डक
- वामनदादा कर्डक यांच्याविषयीचा बीबीसी मराठी-मध्ये प्रकाशित लेख : https://www.bbc.com/marathi/articles/c1k4zexpdvmo.amp
- शाहीर वामनदादा कर्डक यांच्याशी संबंधित उपलब्ध असलेल्या काही ध्वनिचित्रफिती :

- https://youtu.be/HVJtjfS_bcA?si=rGAWGmzJm8nMaUVg
- https://youtu.be/AvnZbZKldAE?si=lG7PSkr-X0KyBK22
- https://youtu.be/tRuK1Z0AHIc?si=ri5JpZwUHqvHUXdi

References:

- Editors: More, Prashant and More, Siddharth. *Mahakavi Vamandada Kardak: Gaana, Shatakaanushatakaancha Vol. 1.* Pratima Prakashan, Pune.
- Editor: Paithankar, Kunal. (2022) *Mahakavi Vamandada Kardak Gaurav Grantha.* Gravity Publication, Akola.

Online Links for more information:

- Marathi Wikipedia entry on Vamandada: https://mr.wikipedia.org/wiki/वामन_कर्डक
- BBC Marathi article on Vamandada Kardak: https://www.bbc.com/marathi/articles/c1k4zexpdvmo.amp
- Video clips related to Shaheer Vamandada Kardak:

- https://youtu.be/HVJtjfS_bcA?si=rGAWGmzJm8nMaUVg
- https://youtu.be/AvnZbZKldAE?si=lG7PSkr-X0KyBK22
- https://youtu.be/tRuK1Z0AHIc?si=ri5JpZwUHqvHUXdi
- https://www.aathavanitli-gani.com/Geetkar/Vaman_Karadak

सानिका म्हसकर ह्या मानसशास्त्र ह्या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत. त्या कथ्थक नृत्य, कवितालेखन, गीतलेखन, वक्तृत्व, निवेदन-सूत्रसंचालन, अभिनय अशा विविध कलांत पारंगत आहेत. 'ट्रंक कॉल फॉर वाइल्ड लाइफ फाउंडेशन' ह्या हत्तींच्या व वन्यजीवांच्या संरक्षण-संवर्धनासाठी कार्यरत संस्थेत त्या स्वयंसेवक म्हणून कार्यरत आहेत.

Sanika Mhaskar is a Master's student of Psychology. She is a skilled Kathak dancer, poet, lyricist, orator, anchor, and actor. She also volunteers for the 'Trunk Call for Wildlife Foundation', an organization dedicated to the protection and conservation of elephants and overall wildlife.

Prabha Kulkarni is a Master's student of literary and cultural studies. She is a writer and an artist active in the field of museology, curation, art and culture.

मराठी स्त्री-गीतांतील सीता

आदिती जाधव

मराठीला लिखित साहित्यासह मौखिक वाङ्मयाचीही समृद्ध परंपरा लाभली आहे. मौखिक परंपरेतील एक महत्त्वाचा छंद-प्रकार आणि काव्य-प्रकार म्हणजे *'ओवी'* होय. ओवीतील चरणांची संख्या, प्रत्येक चरणातील अक्षरांची संख्या, त्यांचे ऱ्हस्व-दीर्घत्व ह्याबाबत सैलसर नियमितता असते. ओवी ह्या काव्यप्रकाराचे दोन मुख्य प्रकार दिसतात — *'ग्रांथिक ओवी'* (म्हणजे लिखित ग्रंथातील ओवी) आणि 'गेय ओवी' (म्हणजे गायली जाऊ शकते अशी लोकगीतांमधील ओवी). लोकगीतांतील गेय ओव्या हा स्त्री-गीतांच्या परंपरेतील एक खूप महत्त्वाचा ठेवा आहे. घरोघरी जात्यावर दळताना स्त्रियांनी उत्स्फूर्तपणे रचलेल्या ह्या ओव्या हे स्त्रियांसाठी फक्त संसाराच्या, सुख-दुःखांच्या गोष्टी सांगण्याचे माध्यम नव्हतं, तर ह्या ओव्यांमध्ये समाज, संस्कृती, धर्म, व्यवहारज्ञान असे अनेक विषय मांडले जात होते.

ह्या ओवीबद्ध गीतांमध्ये स्त्रिया बऱ्याचदा देव-देवतांच्या, पौराणिक व्यक्तिरेखांच्या संसाराचं चित्र उभं करत, त्यातून आपल्या संसाराविषयी व स्त्रीच्या जगण्याविषयी गोष्टी सांगताना दिसतात. भारतातील स्त्रियांच्या पुष्कळ गीतांमध्ये रामायणातील सीता ह्या व्यक्तिरेखेविषयी, तिच्या व रामाच्या संसाराविषयी उत्कटपणे अभिव्यक्ती झालेली दिसते. "रामायणातील सीतेशी या स्त्रियांचे आतड्याचे नाते असावे," असं लोकवाङ्मयाच्या ज्येष्ठ अभ्यासक डॉ. तारा भवाळकर म्हणतात. वाल्मिकींनी लिहिलेल्या रामायणापलीकडे भारतातील विविध प्रदेशांतील लोकपरंपरांत रामायणाची वेगवेगळी रूपं आढळतात. मौखिक परंपरेतील काही कथांमध्ये, गीतांमध्ये सीता जनक राजाला जमिनीतून मिळाली आणि त्याने तिला आपली मुलगी मानली, असा उल्लेख येतो, तर काही रचनांमध्ये त्याला ती सोन्याच्या पेटीत सापडली होती, असा उल्लेख येतो. लोकरामायणामध्ये सीता मुळात रावणाची मुलगी होती, असा संदर्भ येतो. बंगालीमधील चंद्रावती रामायणामध्ये ती आपल्या पित्याच्या म्हणजेच रावणाच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याचं कथन येतं.

ह्या तुलनेत, मराठीतील स्त्रियांच्या ओव्यांमध्ये सीतेच्या जन्माविषयी, तिच्या सौंदर्याविषयी कमी संदर्भ येतात, पण तिने भोगलेल्या दोन्ही वनवासांविषयी

Sita in Marathi Songs Composed by Women

Original Marathi: Aaditi Jadhav
English Translation: Prabha Kulkarni

The Marathi language has been graced with oral literary tradition as well as the written one. One of the important aspects of the oral literary tradition in Marathi is the '*Ovi*', a poetic meter and also a form of poetry. This meter includes loose regularity in terms of the number of lines per stanza, the syllable count and the length of vowels. There are two main types of *Ovi* — '*Granthik Ovi*' (that is found in written texts) and '*Geya Ovi*' (that can be sung and is found in folk songs). *Geya Ovi* in the Folk songs is very important in the tradition of songs sung by women in Marathi. Women in every household would compose *Ovis* spontaneously while grinding grains, serving not only as a medium of self-expression of the joys and sorrows of life, but also as a reflection of society, religion, culture and practical knowledge.

In these *Ovi*-based songs women would often create imagery of the domestic lives of gods and goddesses and mythological characters to reflect their own lives and conditions of being a woman. In many songs by women in India, Sita from *Ramayan* appears quite vividly, especially in reference to her marital life with Ram. Dr. Tara Bhawalkar, a senior researcher in the field of Maharashtrian folk literature says, "The bond these women shared with *Ramayan*'s Sita were as if they were connected to her by an umbilical cord." In the various folk cultures of India, apart from Valmiki's *Ramayan*, many other versions of the *Ramayan* exist. In some stories from such oral traditions, Sita is said to have been found by Raja Janak, who adopted her as his daughter, in the womb of the earth; whereas, some stories narrate that she was found in a gold trunk. In the *Lok-Ramayan*, it is told that Sita was the daughter of Ravan. In the Bengali *Chandraavati Ramayan*, she is even described as the reason for the death of her own father, that is Ravan.

Comparatively, in the Marathi Women's *Ovis*, there are very few references to her birth or her beauty, but is more focus on her experience

मोठ्या प्रमाणात कथन येतं. बऱ्याच मराठी ओव्यांमध्ये स्त्रियांनी सीतेला 'सावळी सीताई / सीताबाई' म्हटलं आहे. सासुरवास (नवऱ्याच्या घरी म्हणजे सासरी जगताना भोगावे लागणारे कष्ट, त्रास, जाच) हा भारतीय स्त्रियांच्या संसारातील अविभाज्य अनुभव, जो मौखिक परंपरेतील अनेक कवयित्रींच्या मते, सीतेलाही चुकला नव्हता. तिने सहन केलेला सासुरवास सांगताना, सीतेकडून तिच्या देशोदेशीच्या सयांना (मैत्रिणींना) म्हणजे सर्व स्त्रियांना हा सासुरवासाचा अनुभव मिळाला आहे, असंही त्या म्हणतात. थोडक्यात, सीतेच्या सासुरवासाविषयी गाताना ह्या कवयित्री स्वतःच्या संसारातील सासुरवासाविषयी बोलताना दिसतात.

अनेक मराठी स्त्री-गीतांत, सीतेने पहिला वनवास रामासोबत सोसला आणि त्या वेळी त्यांचा संसार रानावनात कसा फुलला ह्याचं वर्णन करताना, ही गीतं रचणाऱ्या स्त्रियांनी स्वतःच्या संसारात अनुभवलेलं किंवा अपेक्षिलेलं पती-पत्नीतील प्रेमाचं चित्र रंगवलेलं दिसतं. अशा एका स्त्री-गीतातील सीता रामाला आलेला घाम आपल्या पदराने पुसताना, त्याला वारा घालताना, आणि रामाला पडसं (सर्दी) झाली असता त्याला आलं देताना दिसते.

ह्या पहिल्या वनवासात रावणाने सीतेचं अपहरण केलं. रामाने रावणाशी युद्ध करून सीतेला परत आणलं, पण तिला स्वतःच्या चारित्र्याची शुद्धता अग्निपरीक्षा देऊन सिद्ध करायला सांगितलं. तिने अग्निपरीक्षा दिली. पुढे अयोध्येत परतल्यावर सीता गरोदर राहिली आणि तिच्या चारित्र्याविषयी लोक शंका घेऊ लागले, तेव्हा रामाने 'माहेरी पाठवतो' असं सांगून तिला पुन्हा वनवासात पाठवलं. ह्याविषयी मराठी स्त्री-गीतांत सीतेची पवित्रता, तिचं पतिव्रता असणं रामाला कळलं नाही, अशी खंत उमटते.

सीतेला वनवासातील गरोदरपणात, आणि पुढे तिच्या बाळांना पतीविना वाढवताना किती व कोणते कष्ट सहन करावे लागले असतील ह्याची कल्पनाही ह्या कवयित्री करताना दिसतात. एका स्त्री-गीतात, रामाच्या राजवाड्याच्या बागेत आंब्याची झाडं आहेत, पण सीतेला डोहाळे (गरोदर स्त्रीला खाण्यापिण्याच्या बाबतीत होणाऱ्या इच्छा) लागलेले असताना ती मुरमाचे खडे (माती) खातेय, अशा कल्पनेतून सीतेच्या एकाकी, कष्टमय गरोदरपणाविषयीची करुणा व्यक्त केलीय. दुसऱ्या एका ओवीत, सीता वनामध्ये दगडाच्या उशीवर झोपताना व लव-कुश ह्या बाळांना झोपवताना दिसते.

सीतेच्या दोन्ही मुलांची त्यांच्या पित्याशी, म्हणजेच रामाशी अश्वमेध यज्ञाच्या प्रसंगी भेट झाली.

of the two long exiles. In many *Ovis*, Sita has been referred to as "*Savali Sitai / Sitabai*".

According to many Marathi folk poetesses, the idea of *Sasurvas* (the suffering endured by a woman at her husband's house), an inevitable experience for most Indian women, was something that even Sita could not escape from. While narrating her *Sasurvas*, they also say that all her sister-like friends, that is, women across India, have received the similar kind of painful experience from Sita. Hence, when singing about Sita's *Sasurvas*, these poetesses talk about their own enduring of Sasurvas.

Many *Ovis* illustrate how Sita spent her first exile with Ram, in turn, blooming their marital lives, allowing poetesses to explore desires in their own relationships between husband and wife expecting such love and tenderness. One such imagery is when Sita wipes Ram's sweat with the end of her saree, fans him and gives him ginger when he catches a cold. Ravan kidnaped Sita in their first exile and Ram fought Ravan to save Sita and brought her back. However, she was still asked by him to prove her purity through a trial by fire. She complied. After returning to Ayodhya, she became pregnant and the public suspected her purity again, which made Ram exile her for a second time saying that he was sending her to her father's home. Many *Ovis* lament that Ram failed to recognise Sita's purity and loyalty.

These poetesses wonder about the hardships Sita must have faced when being pregnant in exile and raising her kids without her husband. One *Ovi* imagines that Sita, while pregnant, craves mangoes from Ram's palace gardens and eats pebbles instead, wondering with melancholy, how lonely and full of suffering her pregnancy would have been. In another *Ovi*, Sita is seen sleeping on a stone pillow, trying to lull Luv-Kush to sleep.

Sita's two sons met their father, that is Ram, during the Ashwamedh Yajna. When Ram found out that they are his sons, Ram asked Sita to return to Ayodhya. Some *Ovis* iterate that looking at the twins, her chastity was questioned again and she was asked to prove herself once more through the trial by fire. Through such instances,

लव आणि कुश हे आपले मुलगे आहेत हे समजल्यावर, रामाने सीतेला पुन्हा अयोध्येत बोलावलं. पण तिला जुळी मुलं असल्याने पुन्हा तिच्या चारित्र्यावर शंका घेतली गेली, आणि तिला पुन्हा अग्निपरीक्षा देण्यास सांगितलं गेलं, अशी कहाणी काही ओव्यांमध्ये येते. अज्ञानामुळे, एखाद्या स्त्रीला जुळी मुलं झाल्यावर, तिचा दोन पुरुषांशी शारीरिक संबंध आला होता असणार, असा संशय घेतला जाई, ह्या समाजवास्तवाचं दर्शन ह्या कहाणीतून घडतं. ह्या वेळेस सीतेच्या सहनशक्तीचा अंत गाठला गेला, आणि तिने पुन्हा अग्निपरीक्षा न देता धरणीच्या कुशीत आश्रय घेण्याचा निर्णय घेतला, हा कथाभागही काही ओव्यांत वाचायला मिळतो. ह्या स्त्री-गीतांत अनेकदा, ज्याला ‘पुरुषोत्तम’ (उत्तम असा पुरुष किंवा पुरुषांमध्ये उत्तम) म्हटलं जातं, तो राम आपल्या पत्नीशी ज्या प्रकारे वागला, त्याकडे ह्या स्त्रियांनी ‘पुरुषत्वाचं प्रतीक’ म्हणून पाहिल्याचं, आणि त्याच्यावर ‘हिऱ्यासारख्या सीतेच्या तुलनेत राम हलक्या मनाचा असल्याची’ टीका केल्याचं दिसतं —

“राम म्हनू राम, नाही सीताच्या तोलाचा |
हिरकणी सीतामाई, राम हलक्या दिलाचा ||”

ह्या ओव्या वाचताना, त्या रचणाऱ्या स्त्रिया सीतेकडे आपल्या जगण्याची, एकंदर स्त्री-विश्वाची प्रतिनिधी म्हणून पाहत होत्या का, असा विचार मनात येतो. साहित्य, विशेषतः लोकवाङ्मय हे बऱ्याचदा समाजाचा आरसा असल्याचं प्रत्ययास येतं. लोकगीतांतून, कहाण्यांतून जनमानसाच्या रोजच्या जीवनातल्या गोष्टी उलगडून सांगताना, अनेकदा पौराणिक कथा-कहाण्यांचा आधार घेतला गेलेला दिसतो. अभिजनांच्या लिखित साहित्याच्या परंपरेत सीता ही जनक राजाची कन्या, राजा रामाची पत्नी, कुश-लव ह्यांची आई ह्या ओळखी घेऊन सुशील, पवित्र, आदर्श पतिव्रता ह्याच रूपात भेटत राहते. परंतु मराठी लोकपरंपरेतील स्त्री-गीतांमध्ये, बाईपणाच्या वेदना सोसलेलं, आणि दुसऱ्यांदा अग्निपरीक्षा देण्याचं नाकारून स्वतःच्या स्त्रीत्वाचा, व्यक्तित्वाचा आत्मसन्मान राखणारं, स्वाभिमान जपणारं तिचं रूप हे अधिक ठसठशीतपणे, अधिक उत्कटपणे व्यक्त होत राहतं. मराठी स्त्री-गीतांतून उमटलेली सीतेच्या बाईपणाची वेदना, तिचं तेजस्वी रूप हे सारं लक्ष वेधून घेतंच; पण ह्या ओव्या, सीतेची कहाणी गाता गाता आपापले बाईपणाचे अनुभव व त्यांविषयीच्या भावना व्यक्त करून गेलेल्या अनाम, अज्ञात महाराष्ट्रीय स्त्रियांविषयीही आदरयुक्त कुतूहल जागं करतात.

one understands that women were suspected of having sexual relationships with more than one man when they birthed twins, exposing social biases and misinformation that was perhaps commonly experienced by women.

Some *Ovis* recount that this time, unable to endure such suspicion, she refused the trial by fire and sought refuge in the womb of the earth instead. Often, these *Ovis* critique calling Ram “Purushottam” (the best amongst all men), deeming him as not worthy of a diamond- like Sita because of the way he acted with her. Compared to her, he is critiqued as having a weak heart and mind —

“Ram may be called Ram,
But, he’s not equal to Sita.
Sita, like a diamond,
Ram is of a weak heart.”

Reading these *Ovis*, one wonders whether these women saw Sita’s life as a representation of their own lives and that of womanhood. Literature, especially folk literature is often seen as a mirror to society. Through folk songs and stories, ancient mythological instances are used to represent contemporary life. In elite literary traditions, Sita is looked at as King Janak’s daughter, Lord Ram’s wife and Kush-Luv’s mother, identified as chaste, pure and ideal. But in Marathi women’s folk songs, she is humanised as a woman who has suffered deeply and one who preserves her dignity by refusing a second trial by fire. Her pain, resilience and inner strength is illuminated more intensely in these folk representations.

Even when these representations of Sita are so striking, what’s more striking are the unnamed, unknown Maharashtrian women who left after singing us narratives and emotions about their womanhood and aspirations. Their expressions bring in respectful curiosities in us who listen to their stories.

संदर्भ :

- इंगोले, कृष्णा. (२००४) *लोकसंस्कृतीतील स्त्रीरूपे*. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
- भवाळकर, तारा. (२०२३) *सीतायन*. मनोविकास प्रकाशन, पुणे.
- भोसले, द. ता. (संपा.). (२००५) *लोकजीवन आणि लोकसंस्कृती*. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
- संत, इंदिरा. (१९९६) *मालनगाथा*. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

आंतरजालावरील दुवे :

- *ओवी छंद : रूप आणि आविष्कार* ह्या रोहिणी तुकदेव-लिखित पुस्तकाच्या विकिमीडियावरील पीडीएफ-प्रतीचा दुवा :
  - https://tinyurl.com/mpeh7wr2
- सीतेच्या जीवनातील महत्त्वाच्या स्थानांविषयीचा महाराष्ट्र टाइम्समधील लेख :
  -https://marathi.indiatimes.com/astro/dinvishesh/sita-jayanti-2020-these-are-some-very-important-places-in-devi-sita-life/articleshow/75491073.cms?story=1
- सीतेशी संबंधित काही मराठी स्त्री-गीतांच्या युट्यूब-वाहिनीवर उपलब्ध असलेल्या ध्वनिचित्रफिती :

  - https://youtu.be/E8AveQ8sW-s?si=ZV1Y3sIB8ZYqkdDL
  - https://youtu.be/9MUl6JpCdPo?si=ass0YaTwaY8NqlY2
  - https://youtu.be/qSX9hmQqNpc?si=mELHXJ0HTcS58yNC

References:

- Ingle, Krishna. (2004) *Loksanskrutitil Stree Rupe*. Maharashtra Rajya Sahitya ani Sanskruti Mandal, Mumbai.
- Bhwalkar, Tara. (2013) *Sitayan*. Manovikas Prakashan, Pune.
- Bhosle, D. T. (Ed.). (2005) *Lokjeevan* aani *Loksanskruti*. Maharashtra Rajya Sahitya ani Sanskruti Mandal, Mumbai.
- Sant, Indira. (1996) *Malangatha*. Mehta Publishing House, Pune.

Internet Links:

- Wikimedia PDF copy of the book Ovi Chhand: Roop ani Aavishkar by Rohini Tukdev:
  - https://upload.wikimedia.org/wikipedia/commons/b/b8/ओवी_छंद_-_रूप_आणि_आविष्कार.pdf
- Maharashtra Times article on important places in Sita's life:
  - https://marathi.indiatimes.com/astro/dinvishesh/sita-jayanti-2020-these-are-some-very-important-places-in-devi-sita-life/articleshow/75491073.cms?story=1
- Links to the YouTube Videos related to Ovis about Sita:

  - https://youtu.be/E8AveQ8sW-s?i=ZV1Y3sIB8ZYqkdDL
  - https://youtu.be/9MUl6JpCdPo?si=ass0YaTwaY8NqlY2
  - https://youtu.be/qSX9hmQqNpc?si=mELHXJ0HTcS58yNC

आदिती जाधव ह्या मराठी भाषा-साहित्य व ग्रंथालयशास्त्र ह्या विषयांच्या विद्यार्थिनी असून, 'रातराणी' ही अनुदिनी लिहितात. त्या मुक्तसेवी म्हणून लेखन, ग्रंथालय-संदर्भांचे काम, अक्षरजुळणी व मुद्रितशोधन ह्या क्षेत्रांत कार्यरत आहेत.

Aaditi Jadhav is a student of Marathi language and literature and Library Science. She writes a blog called "Ratrani". As a freelancer, she is active in the fields of writing, library work and referencing, typesetting, and proofreading.

Prabha Kulkarni is a Master's student of literary and cultural studies. She is a writer and an artist active in the field of museology, curation, art and culture.

Learn a Marathi word with MLLI

गाणे / गाणं

gāṇē / gāṇa

नाम, नपुं. / Noun, n.

अर्थ / Meaning

१. गीत
A song

२. गायन ही क्रिया
Act of singing

३. गायन ही कला
Art of singing

४. विशिष्ट गायकाची गायकी / गायन-रीती
Singing-style of a specific artist

उदाहरणे / Examples

१. 'मन तुझं जलतरंग', हे गाणं सध्या खूप गाजतंय.
The *song* 'Mana Tujha Jala-Taranga' is currently quite popular.

२. गाणं बोलण्यासारखं सहज वाटलं पाहिजे.
Singing should feel as natural as speaking.

३. गाणं शिकणं हा एक आनंददायी अनुभव आहे.
It is a joyful experience to learn the art of *singing*.

४. मला लता मंगेशकरांचं गाणं आवडतं.
I like Lata Mangeshkar's *singing* style.

उपक्रम-संकल्पना आणि संपादक: डॉ. आशुतोष पोतदार
Initiative Concept and Editor: Dr. Ashutosh Potdar

संपादन-सहकार्य: डॉ. अनघा मांडवकर आणि प्रभा कुलकर्णी
Editorial Support: Dr. Anagha Mandavkar and Prabha Kulkarni

रचना: रुव नारंग
Design: Ruve Narang

© Marathi Language and Literature Initiative
Department of Design, Art & Performance,
FLAME University, Pune.